पृ.|३८

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
**यशवंत नगर, विरार (प) ता. वसई जि. पालघर पिन नं. ४०१३०३**
**ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com**

---

**प्रशासकिय ठराव क्रं.** 2228

**विभाग :- तलाव विभाग**
**दिनांक :-** 02/02/2026

---

**प्रस्तावाचा विषय** : उमराळे मोठे तलाव ठेक्याच्या निविदेतील रक्कमेबाबत व सदर तलाव लिलाव प्रशासकीय ठराव क्र.७५९ दि. १३/०७/२०२५ मधील ठरावातील अट शिथिल बाबत.

**प्रस्तावाचा मजकुर** : सादर करणेत येते की, प्रभाग समिती "अ" बोळींज विभागात एकुण सात (७) तलावांचे दरपत्रक मागवून मा. प्रशासकिय ठराव क्र. ७५९ दि. १३/०७/२०२५ अन्वये मासे संवर्धन व मासेमारी करीता ठेकेदार नियुक्त करणेत आले आहेत व १००% रक्कम भरणा करुनच करारनामा संविदा करुन कार्यादेश देण्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार सहा (६) तलावांची ठेकेदाराकडून १००% रक्कम भरणा करुन घेऊन करारनामा संविदा करुन कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यापैकी उमराळे मोठे तलाव या तलावाचे ठेकेदार श्री. आरीफ इनास काजी यांना जा.क्र. १०२ दि.१३/०६/२०२५ रोजी मंजूर ठेक्याची १००% रक्कम रु.८,६८,०००/- भरणा करणेबाबत पत्राने कळविले असता सदर ठेकेदाराने ५०% रक्कम रु.४,५०,०००/- क्र.०३२३१९ दि.१०/०७/२०२५ धनाकर्षाने सादर करुन दि.१४/०७/२०२५ रोजी पत्राने कळविणेत आले आहे की, यापूर्वी आम्ही तीन वर्षाच्या निविदा ठेक्यामध्ये तीन हप्त्यात रक्कम भरणा करीत होतो. यावेळी १००% रक्कम मागणी केल्याने आमची तशी परिस्थिती नसल्याने व तलावातील मासे चोरी व मृत होत असल्याने फारसा नफा होत नाही. तरीही ५०% रक्कमेचा धनाकर्ष देऊन करारनामा करुन कार्यादेश मिळणेसाठी पत्राने कळविले होते. त्याबाबत प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावात प्रशासकीय ठरावानुसार, १००% रक्कम भरणा करणेबाबत कार्यवाही करण्याचे प्रशासकीय अभिप्राय दिलेले आहेत.

त्यानुसार उमराळे मोठे तलावाचे ठेकेदार श्री.आरीफ इनायत काजी यांना जा.क्र. १९७ दि.०८/०९/२०२५ रोजी १००% रक्कम भरणा करणेबबात कळविणेत आले असता, सदर पत्राच्या अनुषंगाने ठेकेदाराने आ.क्र. ४११७ दि.२२/०९/२०२५ रोजी पुनश्चः अर्ज सादर करुन ५०% रक्कम रु. ४,५०,०००/- रककमेचा धनाकर्ष स्विकारुन करारनामा करुन कार्यादेश देणेकरीता विनंती केलेली आहे (पृ.क्र.).

सदर तलावाची लिलाव प्रक्रिया दि.०१/०३/२०२५ पासून दरपत्रकानुसार तलाव लिलाव ठेकेदार नियुक्त करणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावास प्रथम मुदतवाढ, द्वितिय मुदतवाढ व फेरनिविदा काढण्यात येऊनही अपेक्षित ठेकेदार सहभागी न होता सात तलावांकरीता प्रत्येकी एकच ठेकेदार सहभागी होऊन प्रत्येकांनी आधारभुत किंमतीवर दरपत्रक न भरना कमी रक्कमेचे दरपत्रक भरलेले आहे. परंतु सतत मुदतवाढ देऊनही ठेकेदार येत नसल्याने सदरच्या दरपत्रकांस प्रशासकिय मंजूरी देऊन सात (७) तलावांचे मंजूर ठेकेदारांकडून १००% रक्कम करारनामा करतेवेळी भरणा करुनच कार्यादेश देण्याचे प्रशासकिय ठराव क्र ७५९ दि.१३/०७/२०२५ नुसार दिल्याने सात तलावांच्या ठेकेदारापैकी कमी दराची रक्कम असलेल्या सहा तलावाच्या ठेकेदारांनी १००%. रक्कम भरणा केलेली आहे. उर्वरीत उमराळे मोठे तलावांची मंजूर रक्कम ८,६८,०००/- असल्याने सदर ठेकेदाराने उपरोक्त ५०% रक्कमेचा रु.४,५०,०००/- धनाकर्ष देऊन १००% रक्कम भरण्यास परिस्थितीमुळे नकार दिलेला आहे व कार्यादेशा नंतर

पुढील एका वर्षात ५०% रक्कम भरण्यास तयारी दर्शविली आहे.

वस्तुस्थिती पाहता उमराळे मोठे तलाव या तलावा शेजारी घरे असून कुटूंब वस्ती आहे त्यामुळे तलावातील मासळी चोरी तसेच मासे मृत होणे असे प्रकार घडत असतात जे पुर्वापार मासेमारी करणारे ठेकेदार आहेत त्यांचे व्यतिरिक्त कोणीही ठेकेदार लिलावात भाग घेत नाहीत त्यामुळे सदर तलाव लिलावाअभावी पडून राहून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असते. सद्यास्थितीत उमराळे मोठे तलाव हा असाच १००% मंजूर रक्कम ठेकेदार भरणा करीत नसल्याने तलाव लिलाव ठेका मंजूर होऊनही करारनामा झालेला नसून कार्यादेश देण्यात आलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे, तरी प्रशासकिय ठराव क्र. ७५९ दि.१३/०७/२०२५ अन्वये करणेत आलेल्या ठरावात करारनामा करतेवेळी १००% रक्कम वसुल करणेबाबतची अट शिथिल करून त्याऐवजी ५०% रक्कम करारनामा करतेवेळी घेऊन पुढील वर्षात ५०% रक्कम वसुल करणेबाबत याप्रमाणे ठरावात दुरुस्ती ठराव मंजूरी झाल्यास उमराळे मोठे तलावाचे ठेकेदार यांचेकडून या अगोदर सादर करणेत आलेला ५०% रक्कमेचा धनाकर्ष स्विकारून करारनामा करुन कार्यादेश देणे सोयीचे होईल. अन्यथा तलाव लिलावाचा मंजूर झालेला ठेका रद्द करुन पुनश्चः तलाव लिलावाचा ठेका काढावा लागेल व मागिल लिलावाचा अनुभव पाहता कोणी ठेकेदार सहभागी होईल याची शाश्वती देत्ता येत नाही, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रस्तावाचा निर्णय** : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अ, बोळींज अंतर्गत उमराळे मोठे तलाव श्री.आरिफ इनाज काझी यांना तीन वर्षाकरीता रक्कम रु. ८,६८,०००/- प्रशासकीय ठराव क्र. ७५९ दि.१३/०७/२०२५ अन्वये मासे संवर्धन् व मासेमारी करीता ठेका नियुक्त करण्यात आलेला आहे. सदर ठरावानुसार ठेकेदाराकडून १००% रक्कम आगाऊ स्वरुपात घेण्याचे नमुद आहे. परंतू सदर तलावाची रक्कम मोठी असल्याने व नियुक्त ठेकेदार हे पुर्वापार मासेमारी करणारे किरकोळ उत्पन्न घेणारे असल्याने १००% रक्कम ठेकेदार आगाऊ स्वरुपात भरणा करणे शक्य नसल्याचे प्रस्तावानुसार प्रथम दर्शनी दिसुन येते. त्यामुळे १००% रक्कम आगाऊ स्वरुपात घेणेबाबत करण्यात आलेल्या प्रशासकीय ठराव क्र. ७५९ दि.१३/०७/२०२५ मधिल अट शिथिल करुन मंजुर ठेकेदाराकडून ५०% रक्कम करारनामा करतेवेळी आगाऊ स्वरुपात घेऊन उर्वरीत ५०% रक्कम करारनामा पासून ७ व्या महिन्यात ५०% रक्कम घेणेकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजसूर्यवंशी

**मनोजकुमार सुर्यवंशी (भाप्रसे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**